पुढारी

# परीक्षांबाबत सोमवारी निर्णय

## ऑनलाईन की ओपन बुक टेस्ट यावर विचार सुरू

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

- **सहा सदस्यीय समिती नियुक्त : उदय सामंत यांची माहिती**
- **कुलगुरूंशी सरकारची चर्चा**
- **३० सप्टेंबरपर्यंत परीक्षा अशक्य**



सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पदवी आणि पदव्युत्तर पदवीच्या अंतिम वर्षांच्या परीक्षांसंदर्भात विचार करण्यासाठी सरकारने मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू सुहास पेडणेकर यांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यांची एक समिती नेमली आहे. ही समिती रविवारीच अन्य कुलगुरू आणि प्राचार्यांशी चर्चा करून आपला अहवाल सरकारला देणार आहे. त्याआधारे सोमवारी परीक्षांबाबतचा पहिला निर्णय घेतला जाईल, अशी माहिती उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली.

येत्या ३० सप्टेंबरपर्यंत परीक्षा घेणे शक्य आहे का, यावर विचार सुरू असून सहा सदस्यीय समिती प्राचार्यांशी तसेच माजी कुलगुरूंशी संवाद साधणार आहे. दरम्यान, कोर्टाच्या निकालानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी घेतलेल्या बैठकीत विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेऊन अतिशय सोप्या पद्धतीने या परीक्षा घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. विद्यार्थ्यांना तयारीसाठी पुरेसा वेळ दिला जाईल, असे सामंत म्हणाले आहेत. कोरोना संक्रमणाची परिस्थिती पाहता अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर बोलावून फिजिकली परीक्षा द्यायला लागू नये, असा सरकारचा प्रयत्न आहे, मात्र याचा विपर्यास करून कुणी विद्यार्थ्यांच्या संभ्रमात भर घालू नये, असे आवाहन सामंत यांनी केले आहे. गडचिरोली आणि चंद्रपूर येथे ३० सप्टेंबरपर्यंत परीक्षा घेणे अशक्य असल्याचे तेथील यंत्रणांचे म्हणणे आहे.

शनिवारी कुलगुरूंसोबत चर्चा करून परिस्थितीचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांना सेंटरला बोलावून परीक्षा घेण्यासारखी सध्याची परिस्थिती नसल्याचे मत कुलगुरूंनी व्यक्त केले, असे उदय सामंत म्हणाले. आम्ही विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ देणार आहोत. ऑनलाईन किंवा ओपन बुक टेस्ट घेऊ शकता, असे विद्यापीठ अनुदान आयोगाने सुचवल्याची माहिती सामंत यांनी दिली.

Kolhapur Edition
Aug 30, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

लोकमत

# परीक्षांसाठी विद्यापीठे होत आहेत सज्ज!

## काहींचा आराखडा तयार; काहींना शासन आदेशाची प्रतीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

### विद्यापीठांची होणार दमछाक!

- राज्यातील १३ अकृषी विद्यापीठांपुढे अंतिम सत्राच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचे आव्हान आहे. यूजीसीच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे राज्यातील विद्यापीठे ऑनलाइन, ऑफलाइन किंवा संमिश्र पद्धतीचा अवलंब परीक्षांसाठी करु शकतील.
- मात्र राज्यातील सर्व विद्यापीठांच्या परीक्षा पद्धतीमध्ये एकसमानता आणणे कठीण असून सध्या राज्यातील कोरोनाची परिस्थिती पाहता प्रत्येक विद्यापीठ आपापल्या स्तरावर निर्णय घेतील, या सर्व नियोजनाला वेळ लागेल, अशी शक्यता तज्ज्ञांनी वर्तवली आहे.
- जेथे ऑनलाइन परीक्षा घेणे अडचणीचे ठरेल, त्या विद्यापीठांमध्ये साहजिकच फिजिकल डिस्टन्सिंग ठेवून त्यांची प्रत्यक्ष पेन व पेपर पद्धतीने परीक्षा घ्यावी लागेल.
- त्यामुळे साधारणत: २ सत्रांत होणाऱ्या परीक्षांची संख्या ३ सत्रांतही होऊ शकते. याशिवाय सद्य:परिस्थितीत जो कर्मचारी १० टक्क्यांवर कार्यरत आहे, त्याची क्षमता १०० टक्के करावी लागेल.

**मुंबई** : सर्वोच्च न्यायालयाने पदवीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा होणारच, या निर्णयावर शिक्कामोर्तब केले आहे. मात्र, अपुऱ्या सोयी-सुविधा, मनुष्यबळ, इंटरनेट कनेक्टिव्हिटी यामुळे विद्यापीठ प्रशासनाला कोविड काळात परीक्षा नियोजनात अडचणी येणार आहेत. मात्र आता परीक्षा घ्यायच्याच म्हटल्यावर राज्यातील विद्यापीठांनी त्यादृष्टीने तयारी सुरु केली आहे. राज्यातील विविध विद्यापीठांच्या अधिकारी, कुलसचिव व समन्वयकांशी बोलून विद्यापीठांची परीक्षांसाठी काय तयारी आहे, याचा 'लोकमत'ने घेतलेला थोडक्यात आढावा :

**मुंबई विद्यापीठ**

मुंबई विद्यापीठाकडून पदविका, पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या १५८ परीक्षांसाठी सुमारे २ लाख २२ हजार ५८१ विद्यार्थी बसणार आहेत. मुंबई विद्यापीठाकडून तयार करण्यात येणाऱ्या कृती आराखड्यानुसार ग्रेडिंग पॅटर्न, एटीकेटी, दूर व मुक्त अध्ययन संस्थेतील वार्षिक परीक्षा पद्धतीनुसार प्रविष्ट झालेले विद्यार्थी, महाविद्यालयांच्या शंकांचे निरसन करून, निर्णय घेतला जाणार आहे.

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

अंतिम सत्रातील २२५ परीक्षा होतील. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एकूण ७५ हजार विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावी लागेल.

**सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे**

ऑनलाइन परीक्षेला प्राधान्य दिले जाण्याची शक्यता आहे. ऑफलाइन परीक्षेचीही चाचपणी केली जाईल. किमान दीड महिन्याचा कालावधी लागेल. येथे परीक्षा देणाऱ्यांची संख्या सुमारे सव्वादोन लाख आहे.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर**

ऑफलाइन परीक्षेची तयारी ९० टक्के झाली आहे. शासनाचे दिशानिर्देश आले की वेळापत्रक तयार करण्यात येईल.

**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

परीक्षा घेण्याचे नियोजन पूर्ण झाले असून केवळ शासनाच्या आदेशाची प्रतीक्षा आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. ईश्वर मोहुर्ले यांनी दिली. या विद्यापीठांतर्गत एकूण १८० महाविद्यालये येतात. १५ हजार विद्यार्थ्यांची परीक्षा घ्यायची आहे. मागील वर्षी ६५ परीक्षा केंद्रे होती. यंदा केंद्रांची संख्या दुप्पट केली जाणार आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**

येथे ऑफलाइन परीक्षा घेण्यात येईल. याविषयीचा कृती आराखडा येत्या चार दिवसांत सादर केला जाईल. पदवीच्या अंतिम वर्षाला ७० हजार विद्यार्थी असून, परीक्षेचा कालावधी वाढवून मागण्यात येणार आहे.

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

या विद्यापीठांतर्गत परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर या जिल्'ातील जवळपास २०० महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षातील साडेपंधरा हजारांहून अधिक विद्यार्थी परीक्षा देतील.

कुलगुरु डॉ. उद्धव भोसले यांनी बैठक घेऊन परीक्षेसंदर्भात पूर्वनियोजन केले. ऑफलाइन परीक्षा घेण्यासंदर्भात नियोजन करण्यात आले आहे.

पुढारी

# ५० परीक्षांचे निकाल आठ दिवसांत जाहीर

## रिपीटर, एटीकेटीचे निकाल लवकरच

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाच्या संकटातही मर्यादित मनुष्यबळावर शिवाजी विद्यापीठ परीक्षा विभागाने गेल्या आठ दिवसांत ५० परीक्षांचे निकाल जाहीर केले आहेत.

कोरोनाच्या संसर्गामुळे महाविद्यालये बंद असून प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या परीक्षा झालेल्या नाहीत. मागील सत्रातील गुणांवर सरासरीच्या आधारे विद्यार्थ्यांना कॅरिफॉरवर्ड करण्याचा निर्णय शासनाने घेतला. परीक्षा विभागातील अधिकारी कोरोनामुळे क्वारंटाईन आहेत. कोरोना संसर्गाचा सामना त्यांना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत कमी मनुष्यबळावर निकाल जाहीर



शिवाजी विद्यापीठातून...

करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यानुसार बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी. प्रथम वर्षाचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. लॉ, बी.व्होकचे निकाल लागले आहेत. प्रथम आणि द्वितीय वर्षासह रिपीटर व ऐटीकेटीच्या विद्यार्थ्यांचे निकाल लवकरच जाहीर केले जाणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे यांनी सांगितले.

Kolhapur Edition
Aug 30, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

# ‘केआयटी’तर्फे आज चर्चासत्र

**कोल्हापूर :** केआयटी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने रविवारी (दि. ३०) सकाळी ११ वाजता वेबेक्स ऑनलाईन व्यासपीठाच्या माध्यमातून 'मन मोकळा श्वास' चर्चात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. वेबिनारचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक प्रा. अभय जायभाये यांच्या हस्ते होणार आहे. समुपदेशक डॉ. कल्याणी कुलकर्णी, वैशाली बुटाले विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. प्रश्नोत्तरातून तरुणाईच्या मनातील अनुत्तरीत प्रश्नांना साद घातली जाणार आहे. वेबिनारमध्ये केआयटीसह अन्य महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार आहे.